लोकमत लाइफ स्टाइल आयकॉन-२०२० पुरस्कार

# महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय आठवडाभरात

## उच्च व तंत्रशिक्षणमंत्री सामंत यांची माहिती

लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : कोरोनाकाळात ऑनलाईन शिक्षणाचे काम सुरू होते. विद्यार्थी आणि प्राध्यापक यांच्यातील प्रत्यक्ष संवाद पुन्हा सुरू करण्याची वेळ आता आली आहे. येत्या आठ - दहा दिवसांत राज्यातील महाविद्यालये सुरू करण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी शनिवारी दिली.

'लोकमत लाइफस्टाइल आयकॉन -२०२०'हा सोहळा सहार स्टार येथे पार पडला. यावेळी सामंत (पान १२ वर)

## 'लोकमत ट्रेंड सेटर्स' या कॉफी टेबल बुकचे प्रकाशन



'लोकमत ट्रेंड सेटर्स' या कॉफी टेबल बुकचे प्रकाशन शनिवार, २३ जानेवारी रोजी मुंबईत राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी हिरे व्यापारी किरीट भन्साळी, अभिनेते सचिन पिळगावकर, उद्योजिका उषा काकडे, लोकमत मीडिया समूहाचे चेअरमन विजय दर्डा आणि दिग्दर्शक नागराज मंजुळे उपस्थित होते. (छाया : दत्ता खेडेकर)

## 'लोकमत' खऱ्या अर्थाने लोकांचे मत बनले आहे - राज्यपाल

मुंबई : स्वर्गीय जवाहरलाल दर्डा यांची समाजाप्रती, देशाप्रती जी समर्पणाची भावना होती, तिच्यामुळेच आज 'लोकमत' खऱ्या अर्थाने लोकांचे मत बनले आहे, असे गौरवोद्गार राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी शनिवारी काढले. सहारा स्टार येथे 'लोकमत ट्रेंड सेटर्स पुरस्कार सोहळ्या'त राज्यपाल बोलत होते.

- वृत्त/१२

# आठवडाभरात महाविद्यालये सुरू करण्याबाबत निर्णय

(पान १ वरून) यांच्यासह अल्पसंख्याक मंत्री नवाब मलिक, वस्त्रोद्योग मंत्री अस्लम शेख, मुंबई काँग्रेस अध्यक्ष भाई जगताप, प्रसिद्ध अभिनेता स्वप्नील जोशी, लागू बंधू मोतीवाले प्रा. लि.चे दिलीप लागू आदी मान्यवर उपस्थित होते. विविध क्षेत्रांत यशाची शिखरे पादाक्रांत करणाऱ्या आणि गुणवत्तापूर्ण जीवनशैलीसाठी कार्यरत व्यक्ती आणि संस्थांना यावेळी लाइफस्टाइल आयकॉन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी सामंत म्हणाले की, कोरोनाकाळात ऑनलाईन पद्धतीने महाविद्यालये सुरू होती. या कालावधीत देशात सर्वात चांगले ऑनलाईन शिक्षण महाविकास आघाडी सरकारच्या महाराष्ट्रात झाले. मुंबई- पुणेसारख्या शहरांना ऑनलाईन व्यवस्था नव्या नाहीत. दुर्गम भागात अडचणी येतील, असे वाटत होते. मात्र, गडचिरोली आणि चंद्रपुरात सर्वात चांगल्या पद्धतीने ऑनलाईन शिक्षण झाले. त्यामुळे या जिल्ह्यांत स्टुडिओ डाटा सेंटरसाठी २५ कोटींचा निधी



'लोकमत लाइफस्टाइल आयकॉन २०२०'च्या कॉफीटेबल बुकचे शनिवारी मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी डावीकडून मुंबई काँग्रेस अध्यक्ष भाई जगताप, अभिनेते स्वप्नील जोशी, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत, अल्पसंख्याक मंत्री नवाब मलिक, वस्त्रोद्योग मंत्री अस्लम शेख आणि लागू बंधू मोतीवाले प्रा. लि.चे दिलीप लागू. (छाया : दत्ता खेडेकर)

जाहीर केला. राज्यात खंडित झालेले पारंपरिक शिक्षण सुरू करण्याची वेळ आली आहे. लवकरच महाविद्यालये सुरू होणार असून, येत्या आठ-दहा दिवसांत याबाबतचा निर्णय घेतला जाईल. महाविद्यालये सुरू करताना स्थानिक प्रशासनाशी चर्चा केली जाईल. विद्यार्थ्यांची सुरक्षा आमच्यासाठी महत्त्वाची आहे. योग्य काळजी घेऊनच महाविद्यालये सुरू होतील, असे सामंत यांनी स्पष्ट केले.

तर, आगामी काळात बदललेली मुंबई लोकांना अनुभवता येईल, असा दावा पालकमंत्री आणि वस्त्रोद्योगमंत्री अस्लम शेख यांनी केला. टोकियोच्या धर्तीवर सिग्नल व्यवस्था उभारण्यात येत आहे. याशिवाय, मुंबईतील उड्डाणपुलांखाली उद्याने आणि सुशोभिकरण करण्यात येईल. मुंबईत प्रत्येक विभागात प्रायोगिक तत्त्वावर पाच शौचालये, दोन पूल, पाच वाहतूक बेटे आणि उद्यानांचे सुशोभिकरण करण्यात येणार असून, त्यासाठी २०० कोटींच्या निधीची तरतूद करण्यात आल्याचे शेख यांनी सांगितले.

याप्रसंगी नवाब मलिक व भाई जगताप यांनीही मनोगत व्यक्त केले. तर, ओटीटी प्लॅटफॉर्ममुळे नवी संधी उपलब्ध झाली आहे. नाटक-सिनेमा व मालिका यांच्यामध्ये मोठा अवकाश आहे. त्याला आता हक्काचे व्यासपीठ मिळणार असल्याचे स्वप्नील जोशी यांनी सांगितले.

# परदेशी शिक्षणासाठी 'एसव्हीसी'तर्फे मार्गदर्शन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

परदेशी शिक्षणासाठी एकाच छताखाली मार्गदर्शन मिळण्याची सोय एसव्हीसी कंपनीने केली आहे. जगातील २५ देशांतील १८०० हून अधिक विद्यापीठांतील शिक्षणाचे अनेक पर्याय उपलब्ध केले आहेत.

कोल्हापूर शहर आणि लगतच्या ग्रामीण भागातील विद्यार्थी हुशार असूनही त्यांची बोलीभाषा इंग्रजी नसल्याने IELTS, TOFFEL, PTE आदी परीक्षांमध्ये हे विद्यार्थी मागे राहतात. या परीक्षांत या विद्यार्थ्यांना चांगला स्कोअर मिळण्यासाठी एसव्हीसीने चांगली तयारी केली आहे. या परीक्षांसाठी प्रत्यक्ष मार्गदर्शन, भरपूर सराव परीक्षा घेऊन पूर्वतयारी केल्याने विद्यार्थ्यांचा परीक्षेतील स्कोअर वाढलेला दिसतो. त्यामुळे मनपसंत विद्यापीठात प्रवेश, शिष्यवृत्ती मिळणे सहज शक्य होते. ही परीक्षा उत्तीर्ण होताच विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणाचा राजमार्ग मोकळा होतो. मात्र, पुढील प्रक्रियेसाठी म्हणजेच विद्यापीठात अर्ज करण्यासाठी एसव्हीसीने आपले ॲप डेव्हलप केले आहे. SVC WorldEd या ॲपद्वारे विविध विद्यापीठांना एकाचवेळी अर्ज करणे शक्य आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना लागणारा वेळ व ताण कमी होतो. प्रवेशानंतर व्हिसासाठी अर्ज करणे, परदेशी चलन, विमान तिकीट, परदेशात राहण्याची सुविधा, इन्श्युरन्स यासाठीही विद्यार्थ्यांना धावपळ न करता एसव्हीसी कंपनीने या सर्व सुविधा एकाच छताखाली उपलब्ध केल्या आहेत. विद्यार्थ्यांना हवे ते सहकार्य करण्यात येणार आहे.

# कर्करोगांवरील त्रासदायक उपचाराला पर्याय

## डॉ. विश्वजित खोत यांचे संशोधन; केमोथेरपीत नॅनो पार्टिकल्स वापर करून उपचार

» आम्ही कोल्हापुरी

**नंदिनी नरेवाडी- पाटोळे :**
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २३ : जगभरात कर्करोगावरील अत्याधुनिक उपचारपद्धतीबाबत संशोधन होत आहे. यात केमोथेरपी आणि सर्जरीला पर्याय उपलब्ध करून देणाऱ्या उपचार पद्धतींचा समावेश आहे.



**डॉ. खोत**

अशाच पद्धतीच्या साईड इफेक्ट कमी करणाऱ्या 'मॅग्नेटिक नॅनो पार्टिकल फॉर डायग्नोसिस अॅण्ड थेरपी ऑफ कॅन्सर' या विषयावर कोल्हापुरातील डॉ. विश्वजित महिपती खोत यांनी संशोधन केले आहे. सध्या प्रचलित असलेल्या केमोथेरपीत कर्करोगाच्या पेशीसोबत शरीरातील इतर अवयवांवर परिणाम होऊन रुग्णांना अधिक त्रासाला सामोरे जावे लागते. डॉ. खोत यांनी संशोधन केलेल्या थेरपीत शरीरातील कर्करोगाच्या पेशींना 'लक्ष्य' करून नॅनो पार्टिकल्सचा वापर करून उपचार केले जाणार आहेत.

'मॅग्नेटिक नॅनो पार्टिकल फॉर डायग्नोसिस अॅण्ड थेरपी ऑफ कॅन्सर' या विषयावरील संशोधनात त्यांनी एमआरआयचा वापर करून रुग्णांना दिलेल्या औषधांचा शरीरातील नेमक्या कर्करोगाच्या पेशींवरच उपचार केला जाणार आहे. त्यांच्या संशोधनामुळे कर्करोगावरील उपचार पद्धती नेमकी व सुटसुटीत होण्यास मदत होणार आहे.

डॉ. खोत मूळचे इचलकरंजीचे. दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स अॅण्ड कॉमर्स कॉलेजमधून त्यांनी पदवीचे शिक्षण पूर्ण केले. शिवाजी विद्यापीठातून भौतिकशास्त्र विषयातून त्यांनी एमएस्सीचे शिक्षण घेतले. त्यानंतर डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठात त्यांनी 'मॅग्नेटिक नॅनो पार्टिकल फॉर डायग्नोसिस अॅण्ड थेरपी ऑफ कॅन्सर' या विषयात संशोधन सुरू केले व पीएच.डी. संपादन केली. त्यांना कौन्सिल ऑफ सायंटिसिक अॅण्ड इंडस्ट्रियल रिसर्चकडून सीनिअर रिसर्च फेलोशिप मिळाली. त्यांना या संशोधनामुळे २०१५ साली युनिव्हर्सिटी कॉलेज लंडन व रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ ग्रेट ब्रिटन येथे पोस्ट डॉक्टरल रिसर्च असोसिएटस् म्हणून संशोधनाची संधी मिळाली. सध्या युनिव्हर्सिटी ऑफ ऑक्सफर्डसोबत याच विषयातील त्यांचे संशोधन अंतिम टप्प्यात आले आहे.

# अभ्यासक्रम आपल्या निवडीचा

## विद्यापीठ अनुदान आयोगाचा नवा मसुदा जाहीर

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

महाविद्यालयीन विद्यार्थी आता आपला अभ्यासक्रम तयार करू शकणार आहेत. एखादी पदवी घ्यायची असेल तर त्यात मुख्य विषय वगळता इतर विषय कोणते असतील हे निवडण्याची मुभा विद्यार्थ्यांना मिळणार आहे. याबाबतचा मसुदा विद्यापीठ अनुदान आयोगाने जाहीर केला आहे. तो अंतिम झाल्यावर त्याची अंमलबजावणी होणार आहे.

प्रवेशाच्या कालावधीत महाविद्यालयात गेल्यावर आपल्याला हातात एक माहिती पुस्तक दिले जाते. त्यात आपल्याला ज्या शाखेत प्रवेश घ्यायचा आहे त्या शाखेत व महाविद्यालयामध्ये जे विषय उपलब्ध आहेत त्याची माहिती दिलेली असते. त्यातूनच आपण विषय निवडून पदवी शिक्षण पूर्ण करतो. पुढे त्यातच पदव्युत्तर पदवी शिक्षण. पण अनेकदा असे लक्षात येते की मला एखादा दुसऱ्या शाखेचा विषय मिळाला असता तर त्याचे ज्ञानही घेता येणे शक्य झाले असते. मात्र सध्या तसा पर्याय उपलब्ध नाही. आता मात्र हा बदल नवीन शिक्षण धोरणात स्पष्ट केला आहे.

विद्यार्थ्यांनी एकाच महाविद्यालयामध्ये तेथे उपलब्ध असलेले शिक्षण का शिकावे त्यांना त्यांच्या आवडीचे शिक्षण मिळावे या उद्देशाने हा निर्णय आयोगाने घेतला आहे. या मसुद्यावर सूचना करण्यासाठी ५ फेब्रुवारीपर्यंतचा अवधी देण्यात आला आहे. यानंतर या सूचनांचा विचार करून त्यानंतर हा मसुदा अंतिम करण्यात येणार आहे.

### मसुदा म्हणतो...

- पदवीसाठी मुख्य तीन विषय आणि इतर विषय विद्यार्थी त्याच्या आवडीने निवडू शकतो या पर्यायासोबतच विद्यार्थ्यांना भिन्न भिन्न शाखांमधील भिन्न भिन्न विषय निवडून शिकण्याची आणि त्या आधारे 'लिबरल आर्ट्स'ची पदवी देण्याची संकल्पनाही मसुद्यात आहे.
- विद्यार्थ्यांची त्यांना विषय निवडताना खूप काळजीपूर्वक विषय निवड करावी लागणार आहे. यासाठी करिअर मार्गदर्शक उपलब्ध करून देण्याची सुचनाही यामध्ये करण्यात आली आहे, कारण आपला अभ्यासक्रम आपण तयार करू शकणार आहोत.
- एखादी पदवी घ्यायची असेल तर त्यात मुख्य विषय वगळता इतर विषय कोणते असतील हे निवडण्याची मुभा विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

# नेताजी सुभाषचंद्र बोस यांना अभिवादन




**कोल्हापूर : नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. विलास नांदवडेकर, व्ही. टी. पाटील आदी.**

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

नेताजी सुभाषचंद्र बोस जयंतीचे औचित्य साधून शहरातील विविध संस्था, संघटनांकडून त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. व्याख्यान, प्रतिमापूजन, तसेच ऑनलाईन कार्यक्रमांचे आयोजन करुन त्यांच्या आठवणींना उजाळा दिला.

**शिवाजी विद्यापीठ**

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, पदार्थविज्ञान अधिविभागप्रमुख डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. पी. एन. वासंबेकर, डॉ. व्ही. जे फुलारी, डॉ. राजीव व्हटकर आदी उपस्थित होते.

**न्यू प्राथमिक विद्यालय**

न्यू प्राथमिक विद्यालयात नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेस मुख्याध्यापिका एस. आर. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या कार्याची ओळख विद्यार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने करून दिली.

**महाराष्ट्र हायस्कूल**

महाराष्ट्र हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त पर्यवेक्षक के. ए. ढगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक ए. एस. रामाणे, उपमुख्याध्यापक ए. एन. जाधव, पर्यवेक्षक यु. एम. पाटील, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

**आझाद हिंद तरुण मंडळ प्रणित दयावान ग्रुप**

आझाद हिंद तरुण मंडळ प्रणित दयावान ग्रुपतर्फे नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस माजी नगरसेवक अजित ठाणेकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी प्रताप देसाई, श्रीकांत पाटील, सुरेश निकम, मोहन जाधव, सुधाम सरनाईक, अभिजित सुर्यवंशी, मानसिंग पोवार, शुभम तोडकर, प्रथमेश मोरे आदी उपस्थित होते.

**वसंतराव नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालय**

वसंतराव नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालयात नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त संस्थेचे अध्यक्ष महादेव व्रांद्रे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील होते. यावेळी प्रा. धनंजय चाफोडीकर, डॉ. मनिषा पाटील, डॉ. आण्णासाहेब पाटील, शुभांगी पाटील, गुरूदास जिरगे, वर्षा पाटील, डॉ. उर्मिला पाटील, विद्यार्थी उपस्थित होते.



कोल्हापूर : 'करवीर छत्रपती दुसरे शिवाजी' ग्रंथाच्या पुनःप्रकाशनप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी राहुल भल्ले आदी.

# 'करवीर छत्रपती दुसरे शिवाजी' ग्रंथाचे विद्यापीठात पुनःप्रकाशन

कोल्हापूर, ता. २३ : 'करवीर छत्रपती दुसरे शिवाजी' पुस्तकाच्या पुनःप्रकाशनामुळे करवीर रियासतीचा दुर्मिळ आणि ऐतिहासिक दस्तावेज नव्या पिढीला वाचनासाठी उपलब्ध झाला आहे,' असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

पार्श्व पब्लिकेशनतर्फे (कै.) डॉ. कमलाकर श्रीखंडे लिखित 'करवीर छत्रपती दुसरे शिवाजी' ऐतिहासिक ग्रंथाचे पुनःप्रकाशन शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले.

डॉ. शिर्के म्हणाले, "दुसरे शिवाजी यांना प्रदीर्घ कारकीर्द लाभली तरी त्यांना शेजारी संस्थानांशी चौफेर संघर्ष करावे लागला. त्यातून त्यांना उसंत लाभली नाही. तरीही त्यांनी करवीर संस्थानाचे प्राणपणाने रक्षण केले. इतकी संघर्षशील कारकीर्द दुर्लक्षित राहिली. ती या निमित्ताने सामोरी येत आहे. इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनिश पाटील म्हणाले, "छत्रपती शिवाजी दुसरे यांची कारकीर्द करवीर संस्थानाच्या दृष्टीने महत्त्वाची असूनही दुर्लक्षित राहिली. ग्रंथाच्या पुनःप्रकाशनामुळे त्यांचे कार्य नव्याने येत आहे." वैभवराज राजेभोसले यांनी मनोगत व्यक्त व्यक्त केले. पार्श्व पब्लिकेशनचे राहुल मेहता, पारस मेहता, आशिष कुलकर्णी, राहुल भल्ले आदी उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठाचा 'बरद्वान'शी करार

कोल्हापूर, ता. २३ : अवकाशविषयक तंत्रज्ञान आणि ग्लोबल सॅटेलाईट बेस्ड नेव्हिगेशन सिस्टीम (जी.एन.एस.एस.) यांच्या संशोधनात आघाडीवर असलेल्या पश्चिम बंगालमधील बरद्वान विद्यापीठाबरोबर शिवाजी विद्यापीठाने सामंजस्य करार केला. ऑनलाईन पद्धतीने कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या उपस्थितीत कार्यक्रम झाला.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, "सुरवात 'जीएनएसएस' विषयक संशोधन सहकार्याने होत असली तरी केवळ तेवढ्यापुरताच हा करार मर्यादित राहू नये, तर दोन्ही विद्यापीठांतील विविध अधिविभागांनी पुढे येऊन हे शैक्षणिक, संशोधनविषयक सहकार्य वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केल्यास त्याची अधिक उत्तम फळे मिळतील. बरद्वान विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. ए. के. पाणिग्रही म्हणाले, "शिवाजी विद्यापीठासमवेत झालेला हा सामंजस्य करार आनंददायी क्षण आहे.

अवकाश संशोधनाच्या अनुषंगाने डाटा विश्लेषणात शिवाजी विद्यापीठाची कामगिरी उच्च दर्जाची आहे. या सहकार्य करारामुळे दोन्ही विद्यापीठांचा अवकाश संशोधनातील लौकिक निश्चितपणे वाढीस लागेल.

कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी तर बरद्वान विद्यापीठातर्फे कुलसचिव डॉ. अभिजित मुझुमदार यांनी स्वाक्षरी केल्या. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. आर. के. कामत, डॉ. पी. के. चक्रवर्ती यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. के. वाय राजपुरे यांनी स्वागत केले. डॉ. राजीव व्हटकर, बरद्वान विद्यापीठाचे डॉ. अनिंद्य बोस यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले.

# नॅनो फॉर्म्युलेशन संशोधनाला बळ

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

सेराफ्लक्स कंपनीतर्फे अद्ययावत नॅनो-फॉर्म्युलेशन्सच्या निर्मितीसाठी इका हायस्पीड ओव्हरहेड स्टीरर 'युरोस्टार-२०' हे उपकरण विद्यापीठातील नॅनो सायन्स व तंत्रज्ञान अधिविभागातील संशोधकांसाठी भेट दिले आहे. या उपकरणामुळे विद्यापीठातील नॅनो फॉर्म्युलेशनच्या संशोधनाला बळ मिळाले आहे.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, सेराफ्लेक्स कंपनीच्या सहकार्यामुळे नॅनोसायन्स विभागात नॅनोफॉर्म्युलेशन विषयक संशोधनाला गती मिळणार आहे. या क्षेत्रातील नवसंशोधन विकसित करण्याच्या प्रयत्न करावा. प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील म्हणाले, नव्या शैक्षणिक धोरणात तसेच विद्यापीठ कायद्यातही विद्यापीठ व उद्योग दोघांनी मिळून समाजोपयोगी संशोधन व उत्पादने तयार करावीत. कंपनीचे संजीव तुंगतकर म्हणाले, या उपकरणामुळे सेराफ्लक्सबरोबर इतर उद्योगांना नॅनोफॉर्म्युलेशन्सच्या निर्मितीसाठी उपयोग होईल. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, संशोधन प्रकल्प प्रमुख डॉ. के. के. शर्मा, डॉ. आर. के. कामत, सेराफ्लक्सचे एकनाथ घाडगे इकोसायन्स इनोव्हेशन प्रा. लि.चे अजय मेहतर उपस्थित होते.

**नॅनोफॉर्म्युलेशन क्षेत्रात संशोधन संधी**

जगभरात नॅनोतंत्रज्ञानावरील संशोधन प्रकल्पांमध्ये 'नॅनोफॉर्म्युलेशन्स आणि नॅनोकोटिंग्स' या संशोधनाला महत्त्व आहे. नॅनोफॉर्म्युलेशन्स हा नॅनोकोटिंगबरोबरच नॅनोतंत्रज्ञान महत्वाचा भाग आहे.

# विद्यापीठातील नॅनो-फॉर्म्युलेशन संशोधनाला मिळाले बळ

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : 'सेराफ्लक्स' कंपनीकडून वैज्ञानिक उपकरण भेट

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

अद्ययावत नॅनो-फॉर्म्युलेशन्सच्या निर्मितीसाठी आवश्यक असणारे हायस्पीड ओव्हरहेड स्टीरर हे उपकरण शिवाजी विद्यापीठाच्या नॅनो सायन्स व तंत्रज्ञान अधिविभागातील संशोधकांसाठी उपलब्ध करून सेराफ्लक्स कंपनीने त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक दायित्वाचे दर्शन घडवले आहे, असे गौरवोद्गार कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी काढले.



'सेराफ्लक्स' कंपनीने भेट दिलेल्या हायस्पीड ओव्हरहेड स्टीररचे औपचारिक उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आदी.

सेराफ्लक्स इंडिया प्रा. लि., कोल्हापूर या कंपनीने शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स' अँड टेक्नॉलॉजीला संशोधन कार्यासाठी हायस्पीड ओव्हरहेड स्टीरर 'युरोस्टार-२०' हे उपकरण भेट दिले आहे. त्याचा प्रदान सोहळा अधिविभागात कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आणि कंपनीच्या प्रमुख अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, सेराफ्लक्स कंपनीच्या या देणगीमुळे नॅनो सायन्स विभागात नॅनो फॉर्म्युलेशनविषयक संशोधनाला गती मिळणार आहे. याच्याशी संबंधित संशोधनाबरोबरच तंत्रज्ञान हस्तांतरण उपक्रम राबवून त्यामध्ये अन्य अधिविभागांतील संशोधकांनाही सहभागी करून घेण्याचा प्रयत्न करावा. त्याचप्रमाणे या क्षेत्रातील सखोल संशोधन विकसित करण्याच्या दिशेनेही प्रयत्न करावेत. यावेळी अधिविभागाचे संचालक डॉ. के. के. शर्मा, डॉ. एस. एन. तायडे यांचे अभिनंदन केले, तर सेराफ्लक्सचे संजीव तुंगतकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांना धन्यवाद दिले.

यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत,

> या उपकरणाच्या रूपाने सेराफ्लक्स आणि इतरही तत्सम उद्योगांना आवश्यक असणाऱ्या नॅनो फॉर्म्युलेशन्सच्या निर्मितीसाठी खूप मोठा आधार निर्माण केला गेला आहे, असा विश्वास सेराफ्लक्सचे संजीव तुंगतकर यांनी व्यक्त केला.

सेराफ्लक्सचे एकनाथ घाडगे व अन्य अधिकारी, इकोसायन्स इनोव्हेशन प्रा. लि.चे अजय मेहतर यांच्यासह स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे शिक्षक, संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

# ‘सेराफ्लक्स’मुळे विद्यापीठातील नॅनो फॉर्म्युलेशन संशोधनाला बळ

## - कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

अद्ययावत नॅनो फॉर्म्युलेशन्सच्या निर्मितीसाठी आवश्यक असणारे हायस्पीड ओव्हरहेड स्टीरर हे उपकरण शिवाजी विद्यापीठाच्या नॅनो सायन्स व तंत्रज्ञान अधिविभागातील संशोधकांसाठी उपलब्ध करून सेराफ्लक्स कंपनीने त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक दायित्वाचे दर्शन घडविले आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीस संशोधन कार्यासाठी सेराफ्लक्स कंपनीतर्फे इका हायस्पीड ओव्हरहेड स्टीरर ‘युरोस्टार-२०’ हे उपकरण भेट देण्यात आले. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, उपकरणामुळे नॅनोसायन्स विभागात नॅनो फॉर्म्युलेशनविषयक संशोधनाला गती मिळणार आहे. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, अशा प्रकारचे संशोधन-सहकार्य विद्यापीठ व औद्योगिक क्षेत्रात होत राहणे आवश्यक आहे. सेराफ्लक्सचे संजीव तुंगतकर, संशोधन प्रकल्प प्रमुख डॉ. के. के. शर्मा यांनी मनोगत व्यक्त केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, सेराफ्लक्सचे एकनाथ घाडगे, अजय मेहतर उपस्थित होते.

**नॅनो फॉर्म्युलेशन क्षेत्रात अनेक संशोधन संधी**

जगभरात नॅनो तंत्रज्ञानावर आधारित सुरू असलेल्या संशोधन प्रकल्पांमध्ये ‘नॅनो फॉर्म्युलेशन्स’ आणि ‘नॅनोकोटिंग्स’ याबाबतच्या संशोधनास महत्त्व आले आहे, असे फॉर्म्युलेशन्स कन्ट्रोल्ड व्हिस्कॉसिटी, टॉर्क, सॉल्व्हंट, स्पीड यासह तापमान व वापरलेले नॅनो-मटेरिअल यांच्या संयुक्त व नियंत्रित मिश्रणप्रक्रियेअंती तयार करता येते. विविध बहुपर्यायी नॅनो फॉर्म्युलेशन्सची निर्मिती करण्याच्या क्षेत्राकडे संशोधन संधींचे क्षेत्र म्हणून पाहिले जात आहे.



कोल्हापूर : हायस्पीड ओव्हरहेड स्टीररच्या औपचारिक उद्घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, संजीव तुंगतकर, डॉ. विलास नांदवडेकर आदी. (छाया : नाज ट्रेनर)

# तक्रारींवर कार्यवाही हवी

## आमदार आबिटकर; 'शिक्षण विभाग आपल्या दारी'साठी बैठक

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २३ : 'शिक्षण विभाग आपल्या दारी' उपक्रमात तक्रारी येतील. यातील बहुतांश तक्रारींचे निराकरण याच उपक्रमात झाले पाहिजे. केवळ समस्या न ऐकता कार्यवाही झाली तरच हा उपक्रम यशस्वी होईल, अशी सूचना आमदार प्रकाश आबिटकर यांनी केली. सोमवारी (ता. २५) होणाऱ्या उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर आज बैठक घेतली.

आमदार आबिटकर यांनी शिक्षण सहसंचालक कार्यालयातील गोंधळ उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांच्यासमोर मांडला. मंत्री सामंत यांनी या विभागाची बैठकही घेतली. या वेळी आबिटकर यांनी 'शिक्षण विभाग आपल्या दारी' या उपक्रमाची कल्पना मांडली. त्यानुसार सोमवारी विद्यापीठात उपक्रम होत आहे. या पार्श्वभूमीवर आज आमदार आबिटकरांनी आढावा बैठक घेतली. कुलसचिव डॉ. विलास नांदिवडेकर यांनी उपक्रमाचे वेळापत्रक, अधिकारी, व्यवस्थेची माहिती दिली.

ते म्हणाले, ''व्यवस्था, तयारी चांगली आहे; पण ज्या वेळी तक्रारदाराच्या तक्रारींचे निरसन होईल, तेव्हाच हा उपक्रम यशस्वी होईल.'' या वेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते.

**तक्रारींचे निवारण होणार**

तंत्रशिक्षण देणारी महाविद्यालये, संस्था यांच्या तक्रारींचे निवारणही येथे होणार आहे. त्यामुळे ज्यांनी ऑनलाईन पोर्टलवर तक्रार दिली, त्यांच्याबरोबरच ऑनलाईन तक्रार न देणाऱ्यांच्याही तक्रारींचे निवारण येथे केले जाईल.

# ‘हायस्पीड ओव्हरहेड स्टीरर’ भेट

## सेराफ्लॅक्स कंपनीचे दायित्व ; नॅनो टेक्नॉलॉजीच्या संशोधनाला बळ

कोल्हापूर, ता. २३ : नॅनो-फॉर्म्युलेशन्सच्या निर्मितीसाठी हायस्पीड ओव्हरहेड स्टीरर उपकरण आवश्यक असते. विद्यापीठातील नॅनो सायन्स व तंत्रज्ञान अधिविभागाला याची आवश्यकता होती. येथील सेराफ्लक्स इंडिया प्रा. लि. कंपनीने हे उपकरण विद्यापीठाला भेट दिले. यामुळे स्कूल ऑफ नॅनो टेक्नॉलॉजीमधील संशोधनाला बळ मिळाले आहे. हा प्रदान सोहळा आज अधिविभागात कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आणि कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झाला.

डॉ. शिर्के म्हणाले, ‘‘सेराफ्लक्स कंपनीने त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक दायित्वाचे दर्शन घडविले आहे. यामुळे नॅनोसायन्स विभागात नॅनोफॉर्म्युलेशनविषयक संशोधनाला गती मिळेल. याच्याशी संबंधित संशोधनाबरोबरच तंत्रज्ञान हस्तांतरण उपक्रम राबवून त्यात अन्य अधिविभागांतील संशोधकांनाही सहभागी करून घेण्याचा प्रयत्न करावा.’’

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, ‘सेराफ्लक्स’चे एकनाथ घाडगे व अन्य अधिकारी, इकोसायन्स इनोव्हेशन प्रा. लि.चे अजय मेहतर यांच्यासह स्कूल ऑफ नॅनोसायन्स अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजीचे शिक्षक, संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.



**कोल्हापूर : उपकरणाची पाहणी करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील व अन्य अधिकारी.**

# जागतिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सज्ज व्हा

## शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे आवाहन : संजय घोडावत विद्यापीठाचा दुसरा पदवीदान समारंभ

प्रतिनिधी
जयसिंगपूर

विद्यार्थ्यांनी जागतिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सज्ज व्हायला हवे. विद्यार्थ्यांकडे ज्ञानासोबत कौशल्य सुद्धा असणे गरजेचे आहे. कौशल्य विकास हा शैक्षणिक क्षेत्रातील मूलभूत कणा आहे. विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा ध्यास घेऊन संशोधन प्रकल्पाद्वारे समाजउपयोगी संशोधन करावे. तसेच नैतिक मूल्यें जोपासून चांगले नागरिक बनणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. संजय घोडावत विद्यापीठाच्या दुसऱ्या पदवीदान समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी घोडावत विद्यापीठाचे अध्यक्ष संजय घोडावत हे होते.

डॉ. शिर्के म्हणाले, संजय घोडावत विद्यापीठ आंतरराष्ट्रीय स्तरावर नावारूपास आलेले विद्यापीठ आहे. पूर व कोविड यासारख्या कठीण काळात या विद्यापीठाने समाजहित जोपासून आपल्या सामाजिक कार्याचा संदेश दिला आहे. घोडावत विद्यापीठाने विविध क्षेत्रात काम करणाऱ्या दिग्गजांना एसजीयु आयकॉन पुरस्कार देऊन गौरविले आहे. या सर्व गोष्टीसाठी एका उत्कृष्ट नेतृत्वाची गरज असते आणि ते नेतृत्व म्हणजे संजय घोडावत होय. येणाऱ्या काळात शिवाजी विद्यापीठाकडून सर्वोतोपरी मदत करु अशी ग्वाही डॉ. शिर्के यांनी दिली.

यावेळी व्यासपीठावर अध्यक्ष संजय घोडावत, विश्वस्त विनायक भोसले, कुलगुरू डॉ. एम. टी. तेलसंग, कुलसचिव डॉ. एन. के. पाटील, परीक्षा नियंत्रक डॉ. श्रीनिवास बाळकुंडी, पी. ए. देसाई, डॉ. यु. पी. जाधव, डॉ. ए. डी. सावंत, डॉ. आबिद सलाती, प्रा. संजयकुमार इंगळे, डॉ. वाय. एल. गिरी आदी मान्यवर उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. एम. टी. तेलसंग यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये विद्यापीठाच्या वार्षिक अहवालाचे वाचन केले. विद्यापीठाच्या यशस्वी वाटचालीबद्दल त्यांनी माहिती दिली.

यावेळी अध्यक्ष संजय घोडावत यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदवीप्रदान करण्यात आली. तसेच घोडावत विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांच्या सन्मान कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमास संचालक डॉ. व्ही. व्ही. कुलकर्णी, परीक्षा विभागाचे सहाय्यक रजिस्ट्रार प्रा. अरविंद कांबळे, प्रा. प्रीतम निकम तसेच सर्व अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. स्नेहल शिंदे, डॉ. सुनंदा शिंदे यांनी केले. आभार कुलसचिव डॉ. एन.के. पाटील यांनी मानले. या कार्यक्रमासाठी विद्यापीठाच्या सर्व टीमने अथक परिश्रम घेतले.



**जयसिंगपूर : घोडावत विद्यापीठाच्या दुसऱ्या पदवीदान समारंभात विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, अध्यक्ष संजय घोडावत, विनायक भोसले, डॉ. एम. टी. तेलसंग, डॉ. एन. के. पाटील, आदी.**

### प्रॅक्टिकल आयुष्यात संकटांना सामोरे जा....

घोडावत विद्यापीठाचे अध्यक्ष संजय घोडावत म्हणाले, विद्यार्थ्यांना प्रॅक्टिकल आयुष्यात अनेक संकटे येतील पण त्या संकटाना सामोरे जाता आले पाहिजे. संधी व आव्हाने या गोष्टी यशाच्या राजमार्गातील कणा आहेत. विद्यार्थ्यांनी सकारात्मक अभिवृत्ती जपायला हवी तसेच विद्यार्थ्यांनी नेहमीच आई वडील व थोरामोठ्यांचा आदर करायला हवा, अभ्यासाबरोबर आरोग्याकडेही लक्ष द्यायला हवे. यशाला कोणताही शॉर्टकट नाही. येणाऱ्या काळात संजय घोडावत विद्यापीठामार्फत लागेल ती मदत देण्यात येईल अशी ग्वाही घोडावत यांनी दिली.

# कौशल्य विकास शैक्षणिक क्षेत्राचा कणा

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; संजय घोडावत विद्यापीठाचा पदवीदान समारंभ

जयसिंगपूर, ता. २३ : विद्यार्थ्यांनी जागतिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सज्ज व्हावे, विद्यार्थ्यांकडे ज्ञानासोबत कौशल्यही गरजेचे आहे. कौशल्य विकास हा शैक्षणिक क्षेत्रातील मूलभूत कणा आहे, विद्यार्थ्यांनी नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा ध्यास घेऊन संशोधन प्रकल्पाद्वारे समाजपयोगी संशोधन करावे, नैतिक मूल्ये जोपासून चांगले नागरिक बनणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. अतिग्रे (ता. हातकणंगले) येथे संजय घोडावत विद्यापीठाच्या दुसऱ्या पदवीदान समारंभात ते बोलत होते.



**अतिग्रे : संजय घोडावत विद्यापीठाच्या दुसऱ्या पदवीदान कार्यक्रमात विद्यार्थिनीला पदवी प्रदान करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, विद्यापीठाचे अध्यक्ष संजय घोडावत, विश्वस्त विनायक भोसले, डॉ. एम. टी. तेलसंग, डॉ. एन. के. पाटील, डॉ. श्रीनिवास बाळकुंडी.**

विद्यापीठाचे अध्यक्ष, उद्योगपती संजय घोडावत अध्यक्षस्थानी होते.

डॉ. शिर्के म्हणाले, "संजय घोडावत विद्यापीठ आज आंतरराष्ट्रीय स्तरावर नावारूपास आलेले विद्यापीठ आहे. पूर व कोविडसारख्या कठीण काळात या विद्यापीठाने सामाजिक कार्याचा संदेश दिला आहे. या विद्यापीठाने विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या दिग्गजांना एसजीयू आयकॉन पुरस्कार देऊन गौरविले आहे. या सर्व गोष्टींसाठी एका उत्कृष्ट नेतृत्वाची गरज असते आणि ते नेतृत्व म्हणजे संजय घोडावत."

कुलगुरू तेलसंग यांनी प्रास्ताविकात अहवाल वाचन केले. अध्यक्ष श्री. घोडावत म्हणाले, "विद्यार्थ्यांना प्रॅक्टिकल आयुष्यात अनेक संकटे येतील पण त्या संकटांना सामोरे जाता आले पाहिजे. संधी व आव्हाने या गोष्टी यशाच्या राजमार्गातील कणा आहेत. विद्यार्थ्यांनी सकारात्मक अभिवृत्ती जपायला हवी. येणाऱ्या काळात संजय घोडावत विद्यापीठामार्फत लागेल ती मदत देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. श्री. घोडावत यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांच्या सन्मान करण्यात आला.

विश्वस्त विनायक भोसले, कुलगुरू डॉ. एम. टी. तेलसंग, कुलसचिव डॉ. एन. के. पाटील, परीक्षा नियंत्रक डॉ. श्रीनिवास बाळकुंडी, श्री. पी. ए. देसाई, डॉ. यू. पी. जाधव, डॉ. ए. डी. सावंत, डॉ. आबिद मल्लाती, प्रा. संजयकुमार इंगळे, डॉ. वाय. एल. गिरी संचालक डॉ. व्ही. व्ही. कुलकर्णी, परीक्षा विभागाचे सहायक रजिस्ट्रार प्रा. अरविंद कांबळे व प्रा. प्रीतम निकम आदी उपस्थित होते. डॉ. स्नेहल शिंदे, डॉ. सुनंदा शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. एन. के. पाटील यांनी आभार मानले.



कोल्हापूर : 'मंत्रालय आपल्या दारी' उपक्रमाची कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडून माहिती घेताना आ. प्रकाश आबिटकर, डॉ. विलास नांदवडेकर.

# 'मंत्रालय आपल्या दारी' तक्रारींची कार्यवाही व्हावी

## आ. आबिटकर यांची विद्यापीठ प्रशासनास सूचना

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

'मंत्रालय आपल्या दारी' उपक्रमात विविध स्वरूपाच्या तक्रारी येतील. यातील बहुतांश तक्रारींचे निराकरण उपक्रमात व्हायला हवे. केवळ समस्या न ऐकता त्यांच्यावर तेथेच कार्यवाही व्हावी, अशा सचूना आमदार प्रकाश आबिटकर यांनी विद्यापीठ प्रशासनास दिल्या.

विद्यापीठात २५ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता उपक्रमाची सुरुवात होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर शनिवारी आ.आबिटकर यांनी कुलगुरू डॉ. शिर्के यांची भेट घेऊन नियोजनाबाबत माहिती घेतली.

आ. आबिटकर यांनी, उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयाच्या भोंगळ कारभाराबाबत संस्थाचालकांच्या अनेक तक्रारी आहेत. त्यासाठी एक स्वतंत्र सत्र ठेवता येईल का? याबाबत सूचना केली.

हा उपक्रम दीक्षांत समारंभाच्या सभागृहात होणार आहे. व्हीआयपी कक्ष, भोजनाची स्वतंत्र व्यवस्था आहे. कोरोना पार्श्वभूमीवर निर्जंतुकीकरण, सोशल डिस्टन्सिंग याचीही काळजी घेण्यात आली आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवेडकर, शशिकांत कांबळे आदी उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय @कोल्हापूर'



महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत 'उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय @कोल्हापूर' हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत महाराष्ट्राचे मा. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री. उदय सामंत हे उच्च व तंत्र शिक्षण विभागातील मंत्रालय व संचालक स्तरावरील अधिकाऱ्यांसमवेत शिवाजी विद्यापीठात प्रत्यक्ष उपस्थित राहून विद्यार्थी, पालक, शिक्षक, प्राचार्य, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यापीठीय कर्मचारी, शैक्षणिक संस्था आदी विविध घटकांच्या अडी-अडचणी ऐकून घेऊन त्या सोडविणार आहेत.

शिवाजी विद्यापीठाने सर्व संबंधित घटकांच्या सोयीसाठी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या वेबसाईटच्या मुख्य पृष्ठावर 'उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय @ कोल्हापूर' हे विशेष पोर्टल निर्माण केले आहे. येथे नागरिकांना इंग्रजी अथवा युनिकोड मराठीतून आपले प्रश्न मांडता येणार आहेत. निवेदनाची सॉफ्ट कॉपी जोडण्याची व्यवस्थाही येथे आहे. त्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण क्षेत्राशी संबंधित सर्व घटकांना आपली निवेदने ऑनलाईन सादर करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. ज्यांना ऑनलाईन निवेदन सादर करणे शक्य होणार नाही, त्यांनाही प्रत्यक्ष उपस्थित राहून मा. मंत्री महोदयांना आपले निवेदन सादर करता येईल, याची नोंद घ्यावी.

**उपक्रमाचा दिनांक : सोमवार, दि. २५ जानेवारी २०२१**

**वेळ : सकाळी ११ वाजता**

**स्थळ : राजमाता जिजाऊ साहेब बहुउद्देशीय सभागृह, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.**

**डॉ. विलास नांदवडेकर**
**(कुलसचिव)**

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## 'उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय@कोल्हापूर'



महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत **'उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय@ कोल्हापूर'** हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत महाराष्ट्राचे मा. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री.उदय सामंत हे उच्च व तंत्र शिक्षण विभागातील मंत्रालय व संचालक स्तरावरील अधिकाऱ्यांसमवेत शिवाजी विद्यापीठात प्रत्यक्ष उपस्थित राहून विद्यार्थी, पालक, शिक्षक, प्राचार्य, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यापीठीय कर्मचारी, शैक्षणिक संस्था आदी विविध घटकांच्या अडी-अडचणी ऐकून घेऊन त्या सोडविणार आहेत.

शिवाजी विद्यापीठाने सर्व संबंधीत घटकांच्या सोयीसाठी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या वेबसाईटच्या मुख्य पृष्ठावर **'उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय@कोल्हापूर'** हे विशेष पोर्टल निर्माण केले आहे. येथे नागरिकांना इंग्रजी अथवा युनिकोड मराठीतून आपले प्रश्न मांडता येणार आहेत. निवेदनाची सॉफ्ट कॉपी जोडण्याची व्यवस्थाही येथे आहे. त्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण क्षेत्राशी संबंधीत सर्व घटकांना आपली निवेदने ऑनलाईन सादर करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. ज्यांना ऑनलाईन निवेदन सादर करणे शक्य होणार नाही, त्यांनाही प्रत्यक्ष उपस्थित राहून मा. मंत्री महोदयांना आपले निवेदन सादर करता येईल, याची नोंद घ्यावी.

- **उपक्रमाचा दिनांक: सोमवार, दि. २५ जानेवारी २०२१**
- **वेळ : सकाळी ११ वाजता**
- **स्थळ : राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृह, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**डॉ. विलास नांदवडेकर (कुलसचिव)**

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## • उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय @ कोल्हापूर •

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत **'उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय @ कोल्हापूर'** हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत महाराष्ट्राचे मा. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री. उदय सामंत हे उच्च व तंत्र शिक्षण विभागातील मंत्रालय व संचालक स्तरावरील अधिकाऱ्यांसमवेत शिवाजी विद्यापीठात प्रत्यक्ष उपस्थित राहून विद्यार्थी, पालक, शिक्षक, प्राचार्य, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यापीठीय कर्मचारी, शैक्षणिक संस्था, आदी विविध घटकांच्या अडीअडचणी ऐकून घेऊन त्या सोडविणार आहेत.



शिवाजी विद्यापीठाने सर्व संबंधित घटकांच्या सोयीसाठी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या वेबसाईटच्या मुख्य पृष्ठावर **'उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय @ कोल्हापूर'** हे विशेष पोर्टल निर्माण केले आहे. येथे नागरिकांना इंग्रजी अथवा युनिकोड मराठीतून आपले प्रश्न मांडता येणार आहेत. निवेदनाची सॉफ्ट कॉपी जोडण्याची व्यवस्थाही येथे आहे. त्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण क्षेत्राशी संबंधित सर्व घटकांना आपली निवेदने ऑनलाईन सादर करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. ज्यांना ऑनलाईन निवेदन सादर करणे शक्य होणार नाही, त्यांनाही प्रत्यक्ष उपस्थित राहून मा. मंत्री महोदयांना आपले निवेदन सादर करता येईल, याची नोंद घ्यावी.

- **उपक्रमाचा दिनांक : सोमवार, दि. २५ जानेवारी २०२१**
- **वेळ : सकाळी ११ वाजता**
- **स्थळ : राजमाता जिजाऊ साहेब बहुउद्देशीय सभागृह, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

सही/- **डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
(कुलसचिव)

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## 'उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय@कोल्हापूर'



महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत **'उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय @कोल्हापूर'** हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत महाराष्ट्राचे मा. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री. उदय सामंत हे उच्च व तंत्र शिक्षण विभागातील मंत्रालय व संचालक स्तरावरील अधिकाऱ्यांसमवेत शिवाजी विद्यापीठात प्रत्यक्ष उपस्थित राहून विद्यार्थी, पालक, शिक्षक, प्राचार्य, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यापीठीय कर्मचारी, शैक्षणिक संस्था आदी विविध घटकांच्या अडीअडचणी ऐकून घेऊन त्या सोडविणार आहेत.

शिवाजी विद्यापीठाने सर्व संबंधित घटकांच्या सोयीसाठी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या वेबसाईटच्या मुख्य पृष्ठावर **'उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय@कोल्हापूर'** हे विशेष पोर्टल निर्माण केले आहे. येथे नागरिकांना इंग्रजी अथवा युनिकोड मराठीतून आपले प्रश्न मांडता येणार आहेत. निवेदनाची सॉफ्ट कॉपी जोडण्याची व्यवस्थाही येथे आहे. त्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण क्षेत्राशी संबंधित सर्व घटकांना आपली निवेदने ऑनलाईन सादर करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. ज्यांना ऑनलाईन निवेदन सादर करणे शक्य होणार नाही, त्यांनाही प्रत्यक्ष उपस्थित राहून मा. मंत्री महोदयांना आपले निवेदन सादर करता येईल, याची नोंद घ्यावी.

**उपक्रमाचा दिनांक : सोमवार, दि. २५ जानेवारी २०२१**

**वेळ : सकाळी ११ वाजता**

**स्थळ : राजमाता जिजाऊ साहेब बहुउद्देशीय सभागृह, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**डॉ. विलास नांदवडेकर**
**(कुलसचिव)**

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## 'उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय @ कोल्हापूर'



महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत **'उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय @ कोल्हापूर'** हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत महाराष्ट्राचे मा. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री. उदय सामंत हे उच्च व तंत्र शिक्षण विभागातील मंत्रालय व संचालक स्तरावरील अधिकाऱ्यांसमवेत शिवाजी विद्यापीठात प्रत्यक्ष उपस्थित राहून विद्यार्थी, पालक, शिक्षक, प्राचार्य, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यापीठीय कर्मचारी, शैक्षणिक संस्था आदी विविध घटकांच्या अडीअडचणी ऐकून घेऊन त्या सोडविणार आहेत.

शिवाजी विद्यापीठाने सर्व संबंधित घटकांच्या सोयीसाठी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या वेबसाईटच्या मुख्य पृष्ठावर **'उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय @ कोल्हापूर'** हे विशेष पोर्टल निर्माण केले आहे. येथे नागरिकांना इंग्रजी अथवा युनिकोड मराठीतून आपले प्रश्न मांडता येणार आहेत. निवेदनाची सॉफ्ट कॉफी जोडण्याची व्यवस्थाही येथे आहे. त्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण क्षेत्राशी संबंधित सर्व घटकांना आपली निवेदने ऑनलाईन सादर करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. ज्यांना ऑनलाईन निवेदन सादर करणे शक्य होणार नाही, त्यांनाही प्रत्यक्ष उपस्थित राहून मा. मंत्री महोदयांना आपले निवेदन सादर करता येईल, याची नोंद घ्यावी.

**उपक्रमाचा दिनांक : सोमवार, दि. २५ जानेवारी २०२१**

**वेळ : सकाळी ११ वाजता**

**स्थळ : राजमाता जिजाऊ साहेब बहुदेशीय सभागृह, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**डॉ. विलास नांदवडेकर**
**(कुलसचिव)**